# अमरावती विभागातील संत्रा कलम उत्पादक विषयक समस्यांचे अध्ययन

**डॉ. प्रज्ञा रामभाऊ निंभोरकर**
रिसर्च स्टुडंट
महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी
चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरूड

---

**प्रस्तावना :**

सद्यास्थितीत अस्तित्वात असलेल्या संत्रा बागांचा विविध कारणांमुळे मोठ्या प्रमाणात ऱ्हास होत आहे. तर दुसऱ्या बाजुने परप्रांतात व महाराष्ट्रातील नविन क्षेत्रात संत्रा कलमांची मागणी वाढत आहे. संत्रा उद्योगाला भेडसावणाऱ्या मुख्य समस्या म्हणजे प्रमाणित कलमांचा अभाव, बागांचा ऱ्हास, अवर्षन, सिंचनाचे दुर्भिक्ष्य, अयोग्य जमिनीत लागवड, पोषण मुल्यांचा अपुरा वापर, नविन तंत्रज्ञानाविषयी उदासिनता इ. आहेत. परिणामत: संत्र्याचे अल्प व अनियमित उत्पादन होते. व बागा लवकर नष्ट होतात. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात प्रारंभी संत्रा लागवडीचा अमरावती विभागातील जिल्हानिहाय संत्रा क्षेत्रफळ व उत्पादन तसेच संत्रा कलम रोपवाटीकांचे महत्व व जिल्हानिहाय संख्या संत्रा कलमा तयार करण्याची थोडक्यात कार्यपध्दती याविषयी माहिती देण्यात आली आहे.

संत्रा कलमांसाठी विशिष्ट प्रकारच्या जमिनीचा वापर करण्यात येतो. परिणामत: जमिनीच्या प्रकारासोबतच कलमांचे प्रकार, खुंटाची निवड याविषयी माहिती गोळा करून त्यावर एक दृष्टीक्षेप टाकण्यात आला आहे. तसेच प्रकरणाच्या दुसऱ्या भागात अध्ययनाकरीता निश्चित केलेली उद्दिष्टये संशोधन क्षेत्र निवड विभागनिहाय नमुना निवड, अध्ययन पध्दती, अध्ययनाची गृहितकृत्ये व संशोधनाच्या मर्यादा इ. बाबींचे संशोधन पध्दती या भागात विस्तृत विवेचन केले आहे.

**उपलब्ध साहित्याचे पुनरावलोकन :**

संशोधन विषयाच्या अनुशंगाने विविध शासकीय संस्थाव्दारे प्रकाशित माहिती तज्ञ व्यक्ती, लेखक, संशोधक यांनी प्रकाशित केलेली माहिती, विविध मासिकांमधील प्रकाशित लेख, इंटरनेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेली माहिती इत्यादीचे समर्पक अवलोकन करणे महत्वपूर्ण असल्यामुळे काही ठराविक शोध प्रकल्पातील काढलेले निष्कर्ष संक्षिप्त स्वरूपात मांडण्यात आलेले आहे.

राष्ट्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन संस्थेने सादर केलेला अहवाल संक्षिप्त स्वरूपात मांडण्यात आला. कलम उत्पादनाबाबतच्या अभ्यासाविषयी रंगपूर व जंभेरी खुंट ओळखण्यासाठी मार्गदर्शक तत्वे मांडण्यात आली असुन त्यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. विषयाशी संबंधीत विविध संशोधने, संशोधन पत्रिकांमधील प्रकाशित साहित्याचा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे. त्याचप्रमाणे शासकीय अहवालात, सरकारने कलमांच्या लागवड, रोप खुंटांची माहिती, रोग रहित कलमांचे उत्पादन कसे घेतले जाते याविषयी माहिती देण्यात आली आहे.

**संत्रा कलमांचे उत्पादन व खर्चाचे अध्ययन :**

कोणत्याही पिकाचे उत्पादन घ्यावयाचे असल्यास त्या पिकांचा ताळेबंद करणे खुपच महत्वाचे असते. आपण लावलेल्या पिकाला सुरूवातीपासून ते शेवटपर्यंत किती खर्च आला तसेच ते उत्पादन विकल्यानंतर त्यापासून किती नफा मिळाला हे पाहणे खुपच महत्वाचे असते. रोपवाटीकांचे उत्पादन पाहण्यासाठी कलमांच्या

प्रकारांलाही तेवढेच महत्व आहे. सोबतच अमरावती विभागातील रोपवाटिकांची संख्या पाहणे महत्वाचे असल्यामुळे त्या दृष्टीकोनातुन सारण्या मांडण्यात आलेल्या आहे. संत्रा कलम तयार करण्यासाठी प्रत्येक निर्विष्टांवर येणारा खर्च तपासण्यात आला असुन त्याचबरोबर कार्यपध्दतीनुसार उत्पादनाला लागणाऱ्या खर्चाचे अध्ययन करण्यात आले आहे.

अमरावती विभागातील उत्पादनाचे प्रमाण, उत्पन्न व खर्च तसेच मिळालेला नफा या विषयी सविस्तर विवेचन केले. कलम उत्पादकाच्या उत्पन्न व खर्चाचे अध्ययन करतांना २००४—०५ ते २०१३—१४ पर्यंतचा कालखंड घेण्यात आला असून या कलमधारकांच्या १० वर्षाच्या उत्पन्न खर्चाचे अंकेक्षित लेखाच्या आधारे कोणत्या वर्षात उत्पादन तसेच उत्पन्न व खर्चात वाढ वा घट झाली यांचे विश्लेषण करण्यात आले आणि या अभ्यासातून निष्कर्ष काढण्यात आले.

**संकलित सामग्रीचे विश्लेषण व निर्वचन :**

प्रस्तुत प्रकरणात गोळा केलेल्या माहितीच्या आधारे नमुना संत्रा कलम उत्पादकांचे वैयक्तिक माहिती, कौटूंबिक माहिती, त्यांची शैक्षणिक स्थिती, उत्पन्नाची स्थिती, विक्री व विपणन विषयक समस्या जाणून घेण्यात आली सेच संत्रा कलम उत्पादकांच्या आर्थिक, सामाजिक तसेच राजकीय माहितीचा आढावा घेण्यात आला. त्यांच्या आर्थिक परिस्थितीवरून त्यांच्या राहणीमानाचा दर्जा तसेच गुंतवणुकीबद्दल माहिती, पाणीपुरवठा आणि कृषी यांत्रिकीकरण, भांडवल तसेच निर्यातविषयी दृष्टीकोणही जाणुन घेण्यात आला आहे. तसेच शासनाकडून संत्रा कलम उत्पादनाला मिळणाऱ्या अर्थसहाय्याबाबत व संत्रा कलम उत्पादनाकडे होत असलेल्या दुर्लक्षाबद्दल त्यांच्या दृष्टीकोनातून जाणुन घेऊन त्यांच्या अपेक्षा जाणून घेण्यात आल्या आहेत. या सर्वेक्षणात्मक अभ्यासातून निष्कर्ष काढण्यात आले आहे.

**अ) संत्रा कलम उत्पादकांचे उत्पन्न—खर्च अध्ययनावरून काढलेले निष्कर्ष :**

अमरावती विभागातील उत्पादन विषयक प्रमुख निष्कर्ष सन २००४ —०५ ते २०१३—१४ या दहा वर्षाचा अभ्यास केला असता अल्पभुधारकांनी ४२७.६८ लक्ष, मध्यम भूधारकांनी ७३१.०५ लक्ष तर मोठया भुधारकांनी ७४२.३ लक्ष उत्पादन घेतल्याचे दिसून आले.

**उत्पन्न व खर्च विषयक निष्कर्ष**

सन २०१२—१३ च्या तुलनेत मागील ८ वर्षातील एकुण उत्पन्नात घट झाली आहे. तर २०१२—१३ आणि २०१३—१४ मध्ये मात्र त्यामागील वर्षापेक्षा उत्पन्नात लक्षणीय वाढ झाली आहे.

**नफा तोटा विषयक स्थिती**

अमरावती विभागात पन्हेरी धारकांना २०१२—१३ मध्ये सर्वाधिक नफा प्राप्त झाला. त्यामानाने इतर वर्षात नफयाचे प्रमाण कमी आहे.

**ब)** कलम उत्पादकांच्या अध्ययनावरून काढलेले निष्कर्षामध्ये वय आणि धर्म विषयक निष्कर्ष काढण्यात आले तसेच शिक्षण आणि वैवाहिक दर्जा, कुटूंबाचा प्रकार, कौटूंबिक सदस्य संख्या व शैक्षणिक स्थिती आणि कुटूंबाचे मासिक उत्पन्न विषयक स्थितीचा समावेश करण्यात आला.

**क)** उत्पादन व विपणन विषयक स्थितीवरून काढलेल्या निष्कर्षामध्ये रोपवाटिकेचा प्रकार, लागणारी बियाणे, विक्रीचे दर व पध्दती विषयक स्थितीवरून निष्कर्ष काढण्यात आलेले आहे.

**शिफारशी :**

अद्यावत रोपवाटीका, विशेष ब्रॅडची निर्मिती, बनावट नोटांवर योग्य ती कार्यवाही, सरकारने संत्रा कलमांच्या विक्रीची जबाबदारी घ्यावी. कलमांना पिकविमा लागू करावा, फळबाग पिक योजनेत पारदर्शकता आणावी. थकीत बिल लवकरात लवकर द्यावी. फळबाग योजना दरवर्षी लागु करण्यात यावी. संशोधन केंद्राचे मार्गदर्शन मिळावले. संशोधन केंद्र उघडावे. नवीन तंत्रज्ञान विकसीत करावे. कृषी सल्लागार नेमावे. पाणीपुरवठ्याबाबत, कलमांची प्रत्यक्षात विक्री करणे, संत्रा कलमांचे बाजारभाव प्रसारित करणे.

**संदर्भसुची :**

- Amin P.V. (NAAMDEM) Book o Santra, Isha Publication 58, Ramkrishna nagar, Nagpur
- बावस्कर, डॉ. वि.सु., लिंबुवर्गीय फळबागातील त्रुटी समस्या व उपाय.
- भांडारकर डॉ. पु.ल. (१९८७) सामाजिक संशोधन पध्दती, महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर
- भोले डॉ. बी.डी. डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.
- डॉ.प्रा. इंगळे, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला एक अध्ययन